महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
कामगार औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
४ था मजला, प्लॉट जी - ९, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११

महावितरण
email : ciro@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

जा.क्र. : काऔसंवि/अ/३९६९० दिनांक : ४/१२/२०१०.

## परिपत्रक

विषय : कंत्राटी पध्दतीवर काम करणाऱ्या कामगारांना सुधारीत दराने मूळ किमान वेतन आणि विशेष भत्ता दर अदा करणेबाबत.

संदर्भ : मुख्य कार्यालयाचे परिपत्रक क्र. काऔसंवि/अ/३३१७ दि. ०१/०२/२०१०.

**********

महावितरण कंपनीमध्ये कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना मूळ किमान वेतन आणि विशेष भत्ता दर देण्याबाबत सांघिक कार्यालयाकडून वेळोवेळी विविध परिपत्रकाद्वारे निर्देशित करण्यात आले होते

शासनाचे उप सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय यांनी दि. २८ सप्टेंबर २०१० च्या महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग १ - ल मध्ये प्रसिध्द केलेल्या अधिसूचनानूसार किमान वेतन अधिनियम १९४८ मधील तरतुदीनुसार कंत्राटी पध्दतीवर काम करणाऱ्या कामगारांचे किमान वेतनाचे सुधारीत दर खालीलप्रमाणे निश्चित केले आहे. त्याप्रमाणे महावितरण कंपनीमध्ये कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना सुधारीत दराने मूळ किमान वेतन आणि विशेष भत्ता दर अदा करणे कायद्यान्वये अत्यावश्यक आहे.

**सुधारीत किमान वेतनाचे दर खालील प्रमाणे आहेत. ( दि. २८ सप्टेंबर २०१० पासून )**

| अ.क्र. (१) | कामगारांची वर्गवारी (२) | मूळ किमान वेतनदर (दरमहा रुपये) | | |
|---|---|---|---|---|
| | | * परिमंडळ - १ | * परिमंडळ - २ | * परिमंडळ ३ |
| | | | (३) | |
| १. | कुशल | ५८००.०० | ५५००.०० | ५२००.०० |
| २. | अर्धकुशल | ५४००.०० | ५१००.०० | ४८००.०० |
| ३. | अकुशल | ५०००.०० | ४७००.०० | ४४००.०० |

*स्पष्टीकरण :- या अधिसूचनेच्या प्रयोजनार्थ.

(अ) परिमंडळ-१.- महाराष्ट्र राज्यातील सर्व 'अ' व'ब' वर्ग महानगरपालिकांच्या हद्दीमधील क्षेत्रांचे मिळून होईल.

(ब) परिमंडळ-२.- महाराष्ट्र राज्यातील सर्व 'क' व 'ड' वर्ग महानगरपालिका, 'अ' वर्ग नगरपरिषदा व सर्व छावणी क्षेत्रांचे मिळून होईल.

(क) परिमंडळ-३.- परिमंडळ १ व २ वगळून राज्याच्या उर्वरित क्षेत्रांचे मिळून होईल.

तसेच कामगार उपायुक्त (ग्रा.वि. आणि अं) व सक्षम प्राधिकारी किमान वेतन अधिनियम-१९४८ मुंबई यांनी दि. २५/१०/२०१० च्या आदेशान्वये दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योगासह इतर उद्योगातील कामगारांकरिता प्रतिदिन - [illegible] **विशेष भत्त्याचे दर दि.२८/०९/२०१० ते ३१/१२/२०१० या कालावधीकरिता** खालीलप्रमाणे जाहीर केले आहेत.

**सुधारीत विशेष भत्त्याचे दर खालील प्रमाणे आहेत.**

| अ.क्र. | अनुसूचित उद्योगाचे नांव | परिमंडळ - १ | परिमंडळ - २ | परिमंडळ - ३ |
|---|---|---|---|---|
| १. | दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योग | १९९.८० | १९९.८० | १९९.८० |

कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयातर्फे वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या विशेष भत्ता दराची (दर ६ महिन्याने होणाऱ्या {सहा महिन्यांकरिता कालावधी म्हणजे "१ जानेवारी ते ३० जून" आणि "१ जुलै ते ३१ डिसेंबर"})अधिसूचना प्रत्येक वर्षाच्या फेब्रुवारी आणि ऑगस्ट या महिन्यामध्ये प्रसारीत करण्यात येत असल्याने विशेष भत्त्याच्या दराचा फरक कंत्राटी कामगारांना अदा करण्यात येत नसल्याबाबत आणि क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांना किमान वेतन अधिनियम १९४८ अन्वये मूळ किमान वेतन देण्यात येत नसल्याबाबतच्या विविध तक्रारी या कार्यालयाकडे लोकप्रतिनिधी आणि संघटना प्रतिनिधी यांनी केलेल्या आहेत.

कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना वरीलप्रमाणे सुधारीत मूळ किमान वेतन आणि विशेष भत्ता दर अदा करणे कायद्यान्वये ठेकेदारावर बंधनकारक असून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने क्षेत्रिय कार्यालयांना याद्वारे निर्देशित करण्यात येते की, वेळोवेळी शासनामार्फत मूळ किमान वेतन आणि विशेष भत्त्याच्या दरामध्ये वाढ झाल्यास त्याप्रमाणे सदर दरवाढ लागू झाल्याच्या तारखेपासून मूळ किमान वेतनाचे आणि विशेष भत्त्याचे दर कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना ठेकेदारामार्फत देण्यात आले असल्याची खातरजमा करण्यात यावी. कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांची भविष्य निर्वाह निधीच्या रकमेची कपात (मुळ किमान वेतन + विशेष भत्त्यांचे दर यावर १२ % कपात) करण्यात यावी आणि कामगार राज्य विमा योजना अंतर्गत करावयाची कपात कायद्याप्रमाणेच ठेकेदारामार्फत होत असल्याची देखिल खातरजमा करण्यात यावी. तसेच याबाबत वेळोवेळी या कार्यालयाने दिलेल्या निर्देशानुसार व विविध कायद्यानुसार आवश्यक असणाऱ्या तरतूदींची अंमलबजावणी करण्यात यावी.

कंत्राटी कामगारांना शासनाने ठरवून दिलेले मूळ किमान वेतन देण्यात येते किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी मुख्य मालक या नात्याने संबंधित सक्षम अधिकारी यांची असल्याने त्यांनी संबंधित ठेकेदारामार्फत कंत्राटी कामगारांना मूळ किमान वेतन देण्याबाबत योग्य ती कारवाई करावी. सदर परिपत्रकामध्ये दिलेल्या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

राहुल गोवर्धन

कार्यकारी संचालक (मा.सं.)

प्रत : प्रेषण यादी प्रमाणे क्षेत्रीय कार्यालयातील कार्यकारी अभियंता स्तरापर्यंत.

E:\Backup Of Meena\D Drive\kantrti kam\revised sept 10 kiman vetan.doc